# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

☎ २५६५६२३४ Email:ropune@dtemaharashtra.gov.in Web Site :- www.ropune.org.in


जा.क्र. तंशिविकापु/विवि/डि.बी.टी.पोर्टल/ २०१९/ 4814 दिनांक :- 25 NOV 2019

प्रति,

प्राचार्य/संचालक

या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व तंत्रशिक्षण संस्था,

विषय :- सन 2019-20 साठी शिष्यवृत्ती योजनांच्या अमलबजावणीबाबत...

संदर्भ :- १.या कार्यालयाचे पत्र क्र जा.क्र.तंशिविकापु/विवि/डि.बी.टी.पोर्टल/ २०१९/४५६० दिनांक ०६/११/२०१९

२. संचालनालयाचे पत्र क्र 18/तशिस/MCM/डीबीटी/2019/520 दिनांक 20/11/2019

उपरोक्त संदर्भिय पत्राद्वारे प्राप्त निर्देशानूसार सर्व संस्थाना सुचित करण्यात येते की, महाडीबीटी पोर्टल वरील

१.राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना

२.डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भता योजना

३.राज्य शासनाची अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती योजना (भाग -१ वैद्यकीय अभ्यासक्रम वगळून)

व केद्रशासन पुरस्कृत गुणवत्ता-नि-साधन शिष्यवृत्ती योजना या योजनांसाठी विद्यार्थ्यांकडून अर्ज स्विकारण्यासाठी दिनांक ३०/११/२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तरी या मुदतवाढीपर्यंत सर्व पात्र विद्यार्थ्यांकडून संस्थांनी अर्ज भरुन घ्यावेत. तसेच संस्थाना तपासणीसाठी दिनांक १६/१२/२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. संस्थांनी त्यांच्या लॉगीन आयडीमध्ये (**Clerk/Principal Login**) विद्यार्थ्यांचे अर्ज तपासणीसाठी प्रलंबित न ठेवता निकाली काढावेत. यानंतर कोणतेही अर्ज तपासणीसाठी प्रलंबित राहीले किंवा कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहीला तर याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेच्या प्राचार्याची राहील याची नोंद घ्यावी.

तसेच विद्यार्थी केंद्र शासनाच्या व महाराष्ट्र शासनाच्या योजनांपैकी कोणत्याही एकाच योजनेचा लाभार्थी असेल यबाबत संस्थांनी दक्षता घ्यावी. विद्यार्थी दोन-दोन योजनांचा लाभार्थी आढळला तर याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्था प्रमुखाची राहील यांचीसुध्दा गंभीरतेने नोंद घ्यावी.

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६१७९६३, फॅक्स - २२६९०००७

E-mail : desk18@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in


**ईमेल / स्पीड पोस्टद्वारे**

क्रमांक : १८/तशिसं/डीबीटी/२०१९/ ५२०

दिनांक : २७ / ११ /२०१९

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

विषय : **महाडीबीटी पोर्टलवरील योजनांच्या कार्यवाहीकरिता वाढीव मुदतीबाबत ......**

संदर्भ : १. या संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०१९/३७१ दि.०५/०८/२०१९

२. या संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०१९/४१५ दि.१९/०९/२०१९

३. या संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०१९/४६० दि.१५/१०/२०१९

४. या संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०१९/४९२ दि.०५/११/२०१९

आपले सरकार डी.बी.टी पोर्टल ( संकेतस्थळ : **https://mahadbtmahait.gov.in** ) वर महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचा समावेश करण्यात आलेला असून त्यामधील खालील योजना तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येतात.

१) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना

२) डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना

३) उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना ( भाग-१ वैद्यकीय अभ्यासक्रम वगळून )

सन २०१९-२० च्या **महाडीबीटी पोर्टलवरील** उपरोक्त योजनांच्या अंमलबजावणीसाठी पोर्टलवरील जाहिर वेळापत्रकानुसार उपरोक्त संदर्भ क्र. १, २ व ३ च्या पत्रान्वये सर्व विभागीय कार्यालयांना व त्यांच्या विभागांतर्गत येणाऱ्या सर्व संस्थांना कळवून, संस्थांनी पोर्टलवरील योजनांसाठीचे अर्ज सर्व पात्र विद्यार्थ्यांकडून भरुन घेण्याच्या व त्यांच्या लॉगीनमध्ये प्राप्त विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन अर्जांची तपासणीची कार्यवाही प्रलंबित न ठेवता विहित वेळेत पूर्ण करण्याबाबत या संचालनालयाने वारंवार सूचित केलेले आहे. उपरोक्त संदर्भ क्र.४ अन्वये विद्यार्थ्यांकडून अर्ज स्विकारण्यासाठी दि.१५/११/२०१९ पर्यंत व संस्थांना तपासणीसाठी दि.३०/११/२०१९ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आल्याबाबत कळविण्यात आलेले होते.

तथापि सोबत जोडलेल्या **महाडीबीटी पोर्टल** वर जाहिर केलेल्या वेळापत्रकानुसार, विद्यार्थ्यांकडून अर्ज स्विकारण्यासाठी **दि.३०/११/२०१९** पर्यंत मुदतवाढ व संस्थांना तपासणीसाठी **दि.१६/१२/२०१९** पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तरी सर्व पात्र विद्यार्थ्यांकडून संस्थांनी अर्ज भरुन घ्यावेत व संस्था / विभागीय कार्यालयांनी त्यांच्या लॉगीन आयडीमधील विद्यार्थ्यांच्या प्राप्त झालेल्या ऑनलाईन अर्जांची तपासणी प्रलंबित न ठेवता विहित मुदतीत निकाली काढावे. जर कोणताही पात्र विद्यार्थी मुदतीच्या आत योजनांचा पोर्टलवरील अर्ज भरण्यापासून वंचित राहीला अथवा संस्थेकडून कोणतेही अर्ज तपासणीसाठी प्रलंबित राहीले तर याची सर्वस्वी जबाबदारी संबंधितांची राहील याची नोंद घ्यावी.

श्री शिंदे
२८.११.१९

( डॉ. सु.प. सावलकर. )

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई.

प्रत : १) मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ४ था मजला, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.
(लक्षवेध : श्री. संजय धारुरकर, अवर सचिव)

२) मा. प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, ७ वा मजला मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सविनय सादर .

३) मा. संचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, पाचवा मजला,मंत्रालय ॲनेक्स बिल्डिंग, मादाम कामा रोड, मुंबई : ३२